महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग, नवीन प्रशासकीय भवन, १० वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
*Email:* docadw.wrd@maharashtra.gov.in

क्र.सीडीए-२०२०/प्र.क्र.१००/२०/लाक्षेवि (कामे) दिनांक :-२७ मे, २०२२

प्रति,

अधीक्षक अभियंता व संचालक,
पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय,
पुणे

**विषय:** - जलक्रांतीचे जनक माजी मुख्यमंत्री स्व.डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या गौरवपूर्ण कार्याच्या स्मरणार्थ जलभूषण पुरस्कार अदा करण्याबाबत

**संदर्भ:**-१) शासन निर्णय क्रमांक, जलसंपदा विभाग, क्र. सिडीए-२०२०/प्र.क्र.१००/२०/ लाक्षेवि (कामे), दि.१३.०५.२०२२

२) आपले पत्र जा.क्र. पासंविसं/सिंचनकक्ष/तांशा-७/१६८२, दि.२०.०५.२०२२

विषयांकीत प्रकरणी संदर्भाधीन क्र.१ येथील शासननिर्णयाच्या अनुषंगाने, संदर्भाधीन क्र.२ येथील पत्रान्वये, आपण नमूद केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने, खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

शासन निर्णय क्रमांक, जलसंपदा विभाग, क्र. सिडीए-२०२०/प्र.क्र.१००/२०/ लाक्षेवि (कामे), दि.१३.०५.२०२२ मधील तरतुदी स्वयंस्पष्ट आहेत. मुद्दा क्र.१ च्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येते की, सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर खाजगी वा अशासकीय व्यक्ती/संस्था यांमध्ये समावेश होत असल्याने त्यांना विहित केलेल्या अटी व शर्तींप्रमाणे नामांकने सादर करण्याची कार्यवाही करता येऊ शकेल.

त्याचप्रमाणे मुद्दा क्र.२ बाबत स्पष्ट करण्यात येते की, सदर पुरस्कारासाठी मागील आर्थिक वर्ष (शासन निर्णयातील मुद्दा क्र.५) दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीतील केलेल्या

कामांबाबत नामांकने मागविण्यात येत आहेत. त्यानुसार सेवानिवृत्त झाल्यानंतर दि.०१.०४.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीतील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांच्या कार्याचा अनुभव विचारात घेणे अपेक्षित आहे.

(शैला जंगम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

... विभाग, मंत्रालय, मुंबई
निर्गमित केले
दिनांक 27/05/2022
स्वाक्षरी : ..........